महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकार्यालय

महसूल शाखा

मध्यवर्ती प्रशासकीयइमारत,पहिला मजला कक्ष क्र.१०४
जयस्तंभ, ता.जि.रत्नागिरी ४१५६१२
दुरध्वनीक्रः- ०२३५२-२२२४८३ फॅक्सक्र. ०२३५२-२२६२५०
०२३५२-२२३६०२Email ID:- revenuecollector@yahoo.in

**क्र.बिशोमो-1/औ.बि./एसआर-42/2017** दिनांक 28/05/2018

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

**वाचले:**

1. युनिसन एनव्हीरो प्रा.लि., डिंगणीकुरण, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांचा दिनांक 24/10/2017 चा अर्ज
2. **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम** 1966 **चे कलम** 44अ
3. सरपंच **ग्रामपंचायत** डिंगणी दिनांक 24/08/2017 चा दाखला
4. **तहसिलदार** संगमेश्वर(देवरुख) यांचे पत्र क्रमांक जबाबी/बिनशेती/एसआर/467/2017, दिनांक 16/01/2018
5. **नगररचनाकार रत्नागिरी** यांचेकडील अभिप्राय जा.क्र.बिशे/मौजे-डिंगणी कुरण ता.संगमेश्वर/ गट नं.40/16/नररत्ना/523, दिनांक 09/03/2018 अन्वये शिफारस.
6. उपअधीक्षक, **भूमि अभिलेख** संगमेश्वर (देवरुख) यांचेमार्फत चलन नंबर **3925786**, **दिनांक** - 28/05/2018 ने रक्कम **रुपये-** 1,000/- भरणा केलेली मोजणी फी

**7.अर्जदार यांनी विकास शुल्क रक्कम रुपये-** 74,600/- **दिनांक** 28/05/2018 ने **भरणा करण्यात आलेली आहे.**

**प्रस्तावना:**

मौजे-डिंगणीकुरण, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथील गट क्रमांक 40/16 क्षेत्र 0.87.00 हे.आर. पैकी 345 चौ.मी ही मिळकत युनिसन एनव्हीरो प्रा.लि., डिंगणीकुरण यांचे वहिवाटीखालील असुन गट क्रमांक 40/16 क्षेत्र 0.87.00 हे.आर. पैकी 345 चौ.मी मध्ये युनिसन एनव्हीरो प्रा.लि., डिंगणीकुरण, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांनी 345 चौ.मी क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यासाठी सदर भूखंडात **औदयोगिक** (City Gas Station) या अकृषिक कारणासाठी परवानगी मिळणे संदर्भात अर्ज दाखल केला आहे.

**या अर्जकामी केलेल्या चौकशीत असे आढळून येते की,**

1. सदर जमीन वर्ग 1 ची असून अर्जदार यांचे मालकीची आहे.
2. सदर जमिन संपादीत नाही अगर शासकीय किंवा सार्वजनिक उपयोगासाठी नजिकच्या काळात संपादन होण्याची शक्यता आहे अगर कसे या बाबत भूसंपादन अधिकारी यांचेकडून अभिप्राय घेण्यात आले आहेत.
3. सदर जमिन रत्नागिरी-सिंधुदूर्ग मंजूर प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट होत असून ग्रामीण भागात येते, असे नगररचनाकार रत्नागिरी यांनी दि.09/03/2018 रोजीच्या पत्राने कळविले आहे.
4. औद्योगिक या अकृषिक कारणासाठी उपयोगात आणण्यास स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टितून सदर जमीन योग्य आहे.
5. नियोजित इमारतीपासून 15 मीटर पेक्षा कमी अंतरावरुन उच्चदाबाची विद्युत वाहिनी जात नाही.
6. अर्जदाराने ज्या अटींवर औद्योगिक बिनशेती परवानगी देण्यात येईल, त्या अटी पाळणेचे मान्य केले आहे.
7. प्रस्तावित औद्योगिक बांधकामामुळे केंद्रशासनाचे पर्यावरण व वनविभागाचे दि.19 फेब्रुवारी 1991 चे अधिसूचनेच्या तरतुदींचा भंग होत नसल्याची खात्री करण्यात आली आहे.
8. नियोजित बिनशेती क्षेत्र प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात समाविष्ट नसल्याबाबत सक्षम अधिका-याचा अभिप्राय घेण्यात आला आहे.
9. सदर इमारतीच्या बांधकामामुळे पथकिनारवर्ती नियमांचा भंग होत नाही
10. **तहसिलदार** संगमेश्वर(देवरुख) यांचे पत्र क्रमांक जबाबी/बिनशेती/एसआर/467/2017, दिनांक 16/01/2018
11. **नगररचनाकार रत्नागिरी** यांचेकडील अभिप्राय जा.क्र.बिशे/मौजे-डिंगणी कुरण ता.संगमेश्वर/ गट नं.40/16/नररत्ना/523, दिनांक 09/03/2018 अन्वये शिफारस केली आहे.
12. महाराष्ट्र अग्निशमन संचालनालयाकडील पत्र क्रमांक **MFS/51/18/297,** दिनांक **15/05**/2018 अन्वयेचे प्रोव्हिजनल नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट.
13. **महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक Consent No:RO-KOLHAPUR/CONSENT/1803000856/37/18, दिनांक 16.03/2018**

उपरोक्त चौकशीच्या पार्श्वभूमीवर पुढील प्रमाणे 1) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 1966 चे कलम 18 नुसार बांधकाम परवानगी 2) महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अध्यादेश 1994 चे कलम 44-अ(2) व (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक परवानगी) नियम 1994चे नियम 11-अनुसार (City Gas Station) या **औद्योगिक प्रयोजनासाठी** बिनशेती परवानगी संदर्भात आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश:-**

जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील 44 अ कलमानुसार प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन अर्जदार युनिसन एनव्हीरो प्रा.लि., रा.डिंगणी कुरण, ता. संगमेश्वर जि.रत्नागिरी यांना मौजे डिंगणी कुरण ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी येथील गट क्रमांक गट क्रमांक 40/16 क्षेत्र 0.87.00 हे.आर. पैकी 345 चौ.मी या मिळकतीमध्ये बांधकाम करण्यासाठी सदर भुखंडाचा **औदयोगिक** (City Gas Station) प्रयोजनासाठी वापर करणेस यादवारे खालील अटी व शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

1. एकूण **0.87.00** हे.आर क्षेत्रात औदयोगिक वापर अर्जदार इमारतीच्या प्रमाणाचे व नियंत्रण रेषांचे पालन करील आणि सोबत जोडलेल्या नकाशामध्ये दाखविलेल्या **345.00 चौ.मी** क्षेत्र बांधकामाखाली येणार असुन, सभोवार **7484.80** चौ.मी. क्षेत्र खुले राहत **असून औद्योगिक** (City Gas Station) **प्लॉटचे क्षेत्र 7829.80 चौ.मी. होत आहे, याप्रमाणे क्षेत्राचा तपशील नकाशात दर्शविलेला आहे.**
2. नियोजित इमारतीचे बांधकाम तळ + 1 मलल्यापेक्षा जास्त असू नये.
3. उक्त भुखंडावर बांधण्यात आलेला कोणताही शौचकूप, मलकुंडी हे सोबतच्या नकाशात अशा प्रयोजनाकरिता कोणतीही जागा अलग ठेवण्यात आली असेल तर अशा जागेवरच बांधण्यात आले पाहिजेत आणि इतरत्र बांधण्यात येता कामा नये.
4. भूखंडाअंतर्गत असणाऱ्या झाडाची तोड करावयाची असल्यास संबधित प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणेची आहे. तसेच 100 चौमीसाठी 1 याप्रमाणे नवीन झाडे लावायची आहेत.
5. देण्यात आलेली परवानगी ही महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 व त्यासाठी केलेल्या नियमातील तरतुदीच्या अधीन राहून तसेच मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948, नगररचना अधिनियम 1966, महाराष्ट्र प्रदुषण अधिनियम 1974 वगैरेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.
6. ज्या कारणाकरीता परवानगी देण्यात आली आहे त्या कारणाकरिताच सदर जमिनीचा व जमिनीवरील बांधकामाचा उपयोग करावा. त्या क्षेत्राचा किंवा त्यापैकी काही भागाचा परवानगी देण्यात आलेल्या कारणा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता कामा नये.
7. नकाशाप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर आखणी करुन त्याची उपअधिक्षक भूमि अभिलेख *संगमेश्वर* यांजकडून एका महात मोजणी करुन मोजणी फी भरलेल्या चलनाची प्रत इकडे सादर करावी. सदरचे आखणीचा प्रमाणित नकाशा या कार्यालयाकडे अंतीम मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे.
8. जागेचा वापर बदलावयाचा झाल्यास अथवा भूखंडाची उपविभागणी करावयाची झाल्यास अथवा रेखांकनात कुठल्याही स्वरुपाचा बदल करावयाचा झाल्यास या कार्यालयाची पूर्वमंजूरी घेणे आवश्यक आहे.

9. प्रस्तावीत औदयोगिक वापर हा रहिवास क्षेत्रात असुन औद्योगिक वापरामुळे हवा, पाणी व ध्वनीप्रदुषण होता कामा नये याबाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची अंतीम जबाबदारी परवानाधारकांची राहिल.

10. बिनशेती दस्ताची दि. 31/7/2018 रोजी संपणा-या मुदतीकरीता हमी राहील. त्यानंतर कोणत्याही सुधारीत दरानुसार बिनशेती दस्त दुरुस्तीसाठी सुधारण्यास पात्र राहील.

11. परवानगीधारकाने जमिनीचा उपयोग बिनशेतीकरिता सुरु केल्यापासून एक महिन्यात मोजणी रक्कम भरुन मोजणी करुन घेणे आवश्यक आहे.

12. ज्या ख-याखु-या औद्योगिक वापराकरिता परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे त्या जमिनी वरील क्षेत्राचा वापर ज्या तारखेपासून भूधारकाने/ परवानाधारकाने सुरु केलेला आहे त्या दिनांका पासून तसेच त्यापुढे दरवर्षी 1ऑगस्ट रोजी सुरु होणा-या व 31जुलै रोजी संपणा-या महसूल वर्षासाठी प्रती चौरस मिटरला 05 पैसे दराने औद्योगिक बिनशेती क्षेत्रावर दिडपट बिनशेती दस्त हा उपकरांसह आकारुन शासनाकडे जमा करावा. त्यानंतर जिल्हाधिकारी वेळोवेळी जो बिनशेती आकारणीचा दर निश्चित करतील तो भरणेस जमीनधारक पात्र राहिल.

13. परवान्यात नमूद केलेले क्षेत्र व बिनशेती दस्त भूमापन खात्याकडून जमिनीची मोजणी झाल्यास प्रत्यक्ष आढळून येणा-या क्षेत्रानुसार पात्र राहिल.

14. बांधकाम करण्याच्या भूखंडाच्या हक्काबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याची इजमेंट राईटबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची राहील.

15. भूखंडातील पारंपारीक रस्ते व पाण्याचे प्रवाहाचे मार्ग कायम खुले ठेवण्याचे आहेत. तसेच खुली जागाही कायम खुली ठेवावयाची आहे.

16. जर परवानाधारकाने /भूखंडधारकाने या आदेशातील अटीविरुध्द कृती केली तर जिल्हाधिकारी हे अधिनियमानुसार त्यास होणा-या इतर शिक्षेस बाधा न आणता जे आदेश देतील त्या प्रमाणे परवानाधारकाने /भूखंडधारकाने दंड आणि दस्त भरल्यावर जागा/ ठिकाण अर्जदार ठेवू शकतील.

17. वर अट क्रमांक 16 मध्ये काहीही सांगितले असले तरीही जिल्हाधिकारी यांना इमारत किंवा बांधकाम मंजूर नकाशाविरुध्द बांधले असेल किंवा उपयोग केला जात असेल तर ते बांधकाम सदर अधिकारी त्याकमी देतील त्यावेळेत काढून टाकण्याचा किंवा सुधारित करण्याचा अधिकार राखून ठेवतील आणि दिलेल्या मुदतीत ते बांधकाम काढून टाकले नाही अगर सुधारित केले नाही तर सदर अधिकारी ते काम करतील आणि झालेला खर्च परवानाधारकाकडून जमीन महसूलाचे थकबाकी प्रमाणे वसूल करतील. ही परवानगी त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या इतर कायद्यातील तरतुदीच्या अधिन राहून देण्यात आली आहे आणि ही परवानगी संबंधित इतर बाबींना लागू राहील.

18. परवानगीधारकाने बिनशेती उपयोग सुरु केल्यापासून 1 महिन्याचे आंत परिशिष्ट 4 मध्ये किंवा महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या उपयोगाचे रुपांतर व बिनशेती दस्त) नियम 1969 ला

जोडलेल्या परिशिष्टात आदेशातील सर्व अटी सनदेत नमूद करुन सनद पूर्ण करुन देण्याचे बंधन राहील.

19. औद्योगिक वापरामुळे सुरक्षितता व पर्यावरणाच्या दृष्टिने कोणताही प्रश्न उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी परवानाधारक यांची राहील.

20. उक्त भूखंडावर उभारलेली कोणतीही इमारत केवळ औद्योगिक प्रयोजनाकरिताच वापरण्यात येईल. तसेच लगत कृषीक्षेत्रास पर्यावरणविषयक धोका निर्माण झाल्यास ती निरसन करण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

21. प्रस्तावित उद्योगामुळे वाहतुकीस कोणत्याही प्रकारे अडथळा होणार नाही याची अर्जदार यांनी दक्षता घेणेची आहे.

22. इमारतीचे बांधकाम करताना अग्नीशमनाचे व अग्नीपासून सुरक्षिततेकरीता नगर परिषदांकरीता आणि नगरपंचायतीकरीता शासनाने लागू केलेल्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीतील भाग सहा आणि नॅशनल बिल्डिंग कोड ऑफ इंडिया मधील भाग चार तरतुदीनुसार बांधकाम करणे अर्जदारास बंधनकारक आहे.

23. महाराष्ट्र अग्निशमन संचालनालयाकडील पत्र क्रमांक **MFS/51/18/297**, दिनांक **15.05.2018** अन्वये प्रोव्हिजनल नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट मधील नमूद अटी व शर्तींचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. तसेच अग्निशमन विभागाकडुन फायनल नो ऑब्जेक्शंन सर्टिफिकेट मिळाल्यानंतरच सदर प्रस्तावास बांधकाम पुर्णत्वाचा दाखला तसेच भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल

24. **नगररचनाकार रत्नागिरी** यांचेकडील अभिप्राय जा.क्र.बिशे/मौजे-डिंगणी कूरण ता.संगमेश्वर/ गट नं.40/16/नररत्ना/523, दिनांक 09/03/2018 अन्वये खालील अटी व शर्तींना अधिन राहून शिफारस केलेली आहे.

I. प्रस्तावातिल जागेचा वापर व नियोजित इमारतीचा वापर फक्त नकाशात दर्शविल्यानुसार औद्योगिक (सिटी गॅस स्टेशन) वापराकरीता करणेत यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

II. स्थळदर्शक नकाशावर भूखंडाच्या हद्दीपासून दर्शविलेली समास अंतरे कायम राखून इमारतीचे बांधकाम करावयाचे आहे.

III. नियोजित व विद्यमान इमारतीचे मिळून बांधकामाची व्याप्ती व एकूण क्षेत्र निव्वळ भूखंड क्षेत्राच्या प्रमाणात व विकास नियंत्रण नियमावलीनुसारच अनुज्ञेय राहील. इमारतीच्या नकाशावर दर्शविलेले भूखंड क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, गणना तक्ते व आकडेमोड अचूक असल्याबाबची खात्री वस्तूशिल्पकार व विकासक यांनी करावयाची आहे. याबाबत काही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

IV. बिनशेती भूखंडाला दर्शविलेला पोचमार्ग, त्याखालील जमिनीचे मालकी हक्क, रस्त्याकरीता संमती याबाबत काही वाद निर्माण झाल्यास सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

V. नियोजित बांधकाम करावायाचा भूखंड व त्याचा पोचमार्ग वर्गीकृत रस्त्यासन्मुख असल्यास संबंधित महामार्ग प्राधिकरणाची परवानगी घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.

VI. प्रस्तावित बांधकामामुळे वहिवाटीचे मार्ग, विजवाहक तारा, नदीनाले, पावसाच्या पाण्याचा प्रवाह इत्यादींना बाधा येत नसल्याचे तसेच त्यापासून योग्य ती सामासिक अंतरे सुटत असलेबाबत सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

VII. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय, सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहिजे. अशी व्यवस्था जवळचे विहिरीपासून किमान 18 मीटर अंतराबाहेर असणे आवश्यक आहे.

25. रेखांकनातील रस्ते पूर्णपणे विकसित व स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या ताब्यात असलेबाबत, तसेच भूखंड मंजूर रेखांकनापैकी असल्यास रेखांकन नकाशा आणि आदेश यामधील अटींचे पालन करणे अर्जदार बंधनकारक राहिल.

26. नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करायचे असल्यास पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

27. विषयांकित जागेतील बांधकाम करताना IS Code 13920-1893 नुसार भूकंप रोधक आर.सी.सी.डिझाईननुसार बांधकाम घटकाचे डिझाईन, अर्हताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून करुन घेणे आवश्यक असून त्यांच्या देखरेखीखालील नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे अर्जदार/ विकासकर्ता यांचेवर बंधनकारक आहे.

28. प्रस्तावित इमारतीचे स्ट्रक्चरल प्लॅन व स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीबाबतचे प्रमाणपत्र संबंधित स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून प्राप्त करुन घेणेची तसेच इमारतीचा प्रत्यक्षात वापर सुरु करणेपूर्वी इमारतीच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलिटीबाबतची कार्यवाही पूर्ण करणेची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहिल.

29. इमारतीचे बांधकाम करताना अग्नीशमनाचे व अग्नीपासून सुरक्षोकरीता नगर परिषदांकरिता आणि नगर पंचायतीकरिता शासनाने लागू केलेल्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावलीतील भाग सहा आणि नॅशनल बिल्डींग कोड ऑफ इंडिया मधील भाग चार तरतुदीनुसार बांधकाम करणे अर्जदारांस बंधनकारक आहे.

30. केंद्रशासनाच्या पर्यावरण व वनविभागाच्या दि.6/1/2011 च्या सीआरझेडच्या अंतिम अधिसूचनेतील क्लॉज नं.2 (ॲनेक्शर-1) नुसार महाराष्ट्र कोस्टल झोन ॲथॉरीटी (MCZMA) तथा पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांनी प्रारुप CZMP नकाशे तयार करुन त्यावर जनतेच्या हरकती सूचना मागविण्यासाठी दि.29 मार्च, 2016 रोजी प्रारुप CMZP तयार केलेले आहे. सदर नकाशातील शिट क्र.E43/N12NW नुसार प्रश्नांकित जमीन ही मौजे डिंगणीकुरण या गावामधील असून सदर गावकरीता सीआरझेड लागू नसल्याचे प्रारुप नकाशानुसार स्पष्ट होत आहे. तसेच नगर रचनाकार रत्नागिरी यांचे कार्यालयाकडे उपलब्ध सीआरझेड अभिलेख नकाशानुसार विषयांकित जागा खाडीच्या उच्चतम भरती रेषेपासून दर्शविलेल्या 100 मी. अंतराच्या पुढे व 500 मी. अंतराच्या आत सीआरझेड क्षेत्र 3 मध्ये समाविष्ट होत आहे. सीआरझेड अंमलबजावणी संदर्भाने एमसीझेडएमए यांनी नवीन प्रारुप प्रसिध्द नकाशे व पूर्व मंजूर सीआरझेड नकाशे यामधील कठोरतम उच्चतम भरती रेषेसंदर्भातील तरतुदी विकास कामांकरीता अवलंबणेबाबत मार्गदर्शक

सूचना समितीच्या 117 व्या बैठकीमध्ये निर्गमित केलेल्या आहेत. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी कठोरत्तम तरतुदी लागू करावयाच्या झाल्यास पूर्व मंजूर सीआरझेड नकाशानुसार विषयांकित जागा 100 मी. अंतराच्या पुढे व 500 मी. अंतराच्या आत समाविष्ट होत आहेत व प्रारुप प्रसिध्द नकाशामध्ये विषयांकित जागा सीआरझेड अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट होत नाही त्यामुळे खाडीच्या उच्चतम भरती रेषेपासून विषयांकित जागा 100 मी. अंतराबाहेर स्थित होत असल्याने एमसीझेडएमए यांचेकडील मार्गदर्शक सूचनांच्या आधारे विषयांकित जागेमध्ये नगर रचनाकार यांनी परवानगीची शिफारस केलेली आहे. मात्र अंतिम अधिसुचनेमध्ये बदल झाल्यास त्यामधील अटी व नियम अर्जदार यांचेवर बंधनकारक राहतील.

31. प्रस्तावाधिन जागेकरीता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा रस्ता सन्मुख असल्याने राज्यमार्गाकरीता आवश्यक 12 मी. रुंदीकरण व 12 मी.रुंदीचा सेवारस्ता याबाबतचे नियोजन दर्शविलेले असून सदर नियोजनानंतर बांधकाम नकाशामध्ये दर्शविल्यानुसार रस्त्याचे नियोजन प्रस्तावित केलेले आहे. रस्ता रुंदीकरण व सेवारस्त्याने बाधित क्षेत्र संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

32. नियोजित सिटी गॅस स्टेशनची जागा 2 अगर जास्त रस्त्याच्या चौकापासून किमान 91.5 मी. दूर असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे शैक्षणिक संस्था, रुग्णालय, प्रेक्षागृहे, चित्रपटगृहे इत्यादी गर्दी खेचणा-या प्रवेशव्दारापासून किमान 91.5 मी. दूर असणे आवश्यक राहील.

33. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम खाते, स्फोटक पदार्थ नियंत्रण संबंधित खाते यांची पूर्व परवानगी घेणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

34. प्रस्तावाधिन वापराच्या अनुषंगाने सदर ठिकाणी काम करणा-या कामगारांची सुरक्षितता व इतर आप्तकालीन परिस्थितीबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित व्यावसायिक जमिनधारक यांची राहील.

35. सदर प्रकरणी नगर रचनाकार, रत्नागिरी यांचे कार्यालयाने केलेली शिफारस शासनाने मंजूर केलेल्या प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार केलेली असल्याने प्रत्यक्षात बांधकाम करताना किंवा बांधकाम झाल्यानंतर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींचा अर्जदाराने भंग केल्यास सदर नियमावलीतील नियम क्र.10.1 नुसार संबंधित अर्जदारावर या कार्यालयाकडून त्वरीत कारवाई केली जाईल.

36. प्रकरणासोबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील दाखला जोडला आहे. त्यामधील अटींची पूर्तता करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

37. प्रकरणासोबत जिल्हा उद्योग केंद्राकडील नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे. त्यामधील अटींची पूर्तता करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

38. Structural Stability व earthquake Resistance Structure बाबत मान्यताप्राप्त RCC Consultant यांचेकडून विषयांकित जागेतील इमारतीचे RCC Design बनविण्यात यावे.

याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार व विकासक यांची राहील.

39. अर्जदारानी सादर केलेले कागदपत्र चुकीचे अथवा दिशाभूल करणारे असल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द होईल व होणा-या संभाव्य कायदेशीर कारवाईस अर्जदार जबाबदार राहतील.

**सही /-XXX**

**(अभिजीत घोरपडे)**

**अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी**

**सोबत-** अर्जदार यांनी सादर केलेल्या नकाशावर बिनशेती परवानगी दिल्याबाबतचे पृष्ठांकन केलेली प्रत.

**प्रति,**

1. युनिसन एनव्हीरो प्रा.लि., डिंगणीकुरण, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांच्याकडे मंजूर बिनशेती नकाशासह.
2. **तहसीलदार संगमेश्वर(देवरुख)** यांचेकडे पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी.
3. **उप अधिक्षक भूमि अभिलेख संगमेश्वर** कमी जास्त पत्रकासाठी मंजूर रेखांकनासह.

**अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता**